महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2572027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/ 1740

दिनांक : 06 JUL 2026

प्रति,

प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२६/२०१ दिनांक २५/५/२०२६.

२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१३४० दिनांक २६/५/२०२६.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१५११ दिनांक १०/६/२०२६.

४) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१५६८ दिनांक १९/०६/२०२६.

५) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/२०२६/१६०४ दिनांक १९/०६/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तूकला परिषद अशा शिखर परिषदांव्दारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असून पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना या शिखर परिषदांव्दारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्यानुषंगाने आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई सलग्नता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक २२ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत करण्यात आले होते. अद्यापही काही संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई सलग्नता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन **दिनांक ०८ जूलै २०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करुन या कार्यालयात आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहून RO Login मधून अद्ययावत करुन घ्यावी.** कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामूळे संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहिल. तसेच, मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायान प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उदभवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

(डॉ. वि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,